International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.5 May – June 2024

# मंत्रीमंडळाची सामूहिक जबाबदारी-भारत

**प्रा. अधिकराव हिंदुराव निकम**
*राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्री. विजयसिंह यादव महाविद्यालय पेठवडगांव, कोल्हापूर.*
*Corresponding Author - प्रा. अधिकराव हिंदुराव निकम*
DOI - 10.5281/zenodo.14684866

**प्रस्तावना:**

मंत्रीमंडळाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे सामूहिक जबाबदारीचे तत्त्व होय. घटनेच्या कलम ७४ नुसार सामूहिक जबाबदारी म्हणजे त्यापैकी जण जे करतो किंवा जे करायला अपयशी होतात त्याला सर्वजण एक घटक म्हणून सामूहिकरित्या जबाबदार ठरतात. यामध्ये सर्वजण एकत्रित राहतात, ते एकत्रित जगतात, एकत्रित बुडतात. प्रशासनाची वेगवेगळी खाती वेगवेगळया मंत्र्यामध्ये विभागली गेली असतात. ते सर्व जण वेगवेगळया विभागाचा कारभार बघतात. मंत्रीमंडळ हे संसदेमध्ये सामूहिकपणे किंवा एक संघ संस्था म्हणून उत्तरदायी ठरतात. सर्व मंत्री जे काही करतात त्याला सर्वच मंत्रीमंडळ सामूहिक जबाबदार रहातात.

लोकसभेत मंत्रीमंडळ सामूदायिकपणे जबाबदार आहे याचा अर्थ असा की, जोपर्यंत लोकसभेचा विश्वास मंत्रीपरिषदेवर आहे. तोपर्यंत ते मंत्रीमंडळ अधिकार पदावर राहू शकते. पंतप्रधानाची नेमणूक करण्याचा अधिकार जरी राष्ट्रपतींना असला तरी सामुदायिक तत्त्वामुळे ती नेमणूक करताना पंतप्रधान लोकसभेच्या विश्वासातील व्यक्ती पाहिजे हे पहावे लागते. याचा अर्थ असा की, लोकसभेच्या निवडणुका झाल्यावर ज्या राजकीय पक्षाला लोकसभेत निर्विवाद बहुमत मिळालेले असते त्याच पक्षाच्या नेतृत्त्वाला पंतप्रधान होण्याची व मंत्रीमंडळ बनविण्याची सूचना राष्ट्रपतीनी केली पाहिजे. कारण अशा पंतप्रधानावर लोकसभेचा विश्वास असतो व ते मंत्रीमंडळ लोकसभेस सामूहिकपणे जबाबदार राहू शकते. एकदा पंतप्रधान म्हणून निवड झाल्यावर जर त्या पक्षाच्या सभासदांची संख्या बहुमतापेक्षा कमी झाली तर पंतप्रधानांनी राजीनामा दिला पाहिजे. या तत्त्वाला अनुसरून जुलै १९७९ मध्ये श्री. मुरारजी देसाई यांनी आपल्या पंतप्रधान पदाचा व मंत्रीमंडळाचा राजीनामा राष्ट्रपती नीलम संजीव रेड्डी यांच्याकडे सादर केला होता. त्याचप्रमाणे जर लोकसभेने मंत्रीमंडळाविरूद्ध अविश्वासाचा ठराव संमत केला तर पंतप्रधानांनी राजीनामा दिला पाहिजे. यालाच सामूहिक जबाबदारी तत्त्वानुसार चालणारी राज्यपद्धती म्हणतात. ही जबाबदारी सामुहिक असून याचे वेगवेगळे पैलू आहेत.

१) जर पंतप्रधानाने आपला स्वत:च्या पदाचा राजीनामा दिला व मंत्रीमंडळातील इतर मंत्र्यांनी राजीनामे दिले नाहीत तर पंतप्रधानाचा राजीनामा स्विकारल्यावर सर्व

मंत्रीमंडळच अधिकार पदावरून गेले असे होते.

२) जरी एखाद्या विशिष्ट मंत्र्याविरूद्ध लोकसभेने अविश्वासाचा ठराव संमत केला तरी त्याचा अर्थ सर्वच मंत्रीमंडळाविरूद्ध तो ठराव संमत झाला असे होते व पंतप्रधानाला देखील राजीनामा द्यावा लागतो. कारण त्या मंत्र्याविरूद्ध जरी तसा तो ठराव असला तरी त्या मंत्र्याचे धोरण हे मंत्रीमंडळाने मान्य केलेले धोरण होते. म्हणून संपूर्ण मंत्रीमंडळच सामूहिकरित्या जबाबदार असते.

३) पंतप्रधान असणारी व्यक्ती जर निधन पावली तर सर्वच मंत्रीमंडळ अधिकार पदावरून दूर होते. पंतप्रधान पंडित नेहरू यांचे मे १९६४ साली निधन झाले, त्यावेळी राष्ट्रपती राधाकृष्णन यांनी श्री. जी. एल. नंदा यांना तात्पुरते पंतप्रधान नेमले होते. त्याचप्रमाणे लाल बहाद्दूर शास्त्री यांचे १९६६ साली निधन झाले. त्यावेळी देखील राष्ट्रपतींनी श्री. नंदा यांनाच तात्पुरते पंतप्रधान पदी नेमले होते. या दोन्ही ही वेळी श्री. नंदा यांनाच तात्पुरते पंतप्रधान पदी नेमले होते. दोन्ही ही वेळी श्री. नंदा यांच्या सल्यानुसार इतर मंत्र्यांची नेमणूक केली होती.

४) मंत्रीमंडळाने एकदा निर्णय घेतला की, सर्व मंत्र्यांनी त्या निर्णयाचे जाहीररित्या समर्थन केले पाहिजे. मंत्रीमंडळातील चर्चेच्या वेळी भिन्न मतप्रदर्शन शक्य नसते. ही भूमिका पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्पष्ट केली होती. जे मंत्री मंत्रीमंडळाच्या निर्णयाशी सहमत होऊ शकत नाहीत किंवा ज्या मंत्र्यांचा पंतप्रधानांच्या धोरणाविषयक मतभेद असतील त्या मंत्र्यांना राजीनामा देण्याशिवाय अन्य कोणताही मार्ग शिल्लक नसतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री. व्ही. व्ही. गिरी, श्री. सी. डी. देशमुख, श्री. ए. बी. जैन, श्री. महावीर त्यागी आणि श्री. एम. सी. छगल या मंत्र्यांनी ही याच कारणासाठी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. तर काही मंत्र्याच्या विरूद्ध भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले होते म्हणून त्यांनी राजीनामा दिला. त्या मंत्र्यांमध्ये प्रामुख्याने श्री. टी. टी. कृष्णमाचारी, श्री. के. डी. मालवीय व डॉ. एम. चन्ना रेड्डी व १९६९ साली श्री. मुरारजी देसाई यांच्याकडचे अर्थखाते काढून घेतले म्हणून त्यांना आपल्या पदाचा राजीनामा दिला होता.

मंत्रीमंडळातील मंत्री स्वत:च्या खात्यात अपयश आले तर राजीनामा देतो किंवा स्वत:च्या खात्यात काही दुर्देवी घटना घडली तर मंत्री आपला पदभार सोडून देतात. इ. स. १९९२ साली उद् भवलेल्या शेअर्स घोटाळा प्रकरणात तत्कालीन मंत्री पी. चिदम्बरम यांना राजीनामा द्यावा लागला होता. रे. के. अवधान-रेल्वे मंत्री लालबहादूर शास्त्री यांनी तर एअर लाईन्स विमान दुर्घटनेची केंद्रीय नागरी

आणि पर्यटन मंत्री श्री. माधवराव शिंदे नी १९९३ मध्ये जबाबदारी स्विकारून राजीनामा दिला होता.

सामूहिक उत्तरदायित्व किंवा मंत्रीमंडळाची सामूहिक जबाबदारी विविध प्रकारे प्रकट होते. जो मंत्री शासनाच्या निर्णयाशी सहमत नसेल किंवा इतर मंत्र्यांची जबाबदारी स्वत:वरती घेवू इच्छित नसेल तर तो राजीनामा देतो. डॉ. शामप्रसाद मुखर्जी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. षणमुखानंद चेट्टी, जॉन मथाई, डॉ. सी. डी. देशमुख, श्री. व्ही. व्ही. गिरी, श्रीमती इंदिरा गांधी सरकार मधील नियोजन मंत्री मोहन धारीया, राजीव गांधी यांच्या मंत्रीमंडळातील व्ही. पी. सिंग यांनी राजीनामा दिला होता.

मंत्रीमंडळाची जरी सामूहिक जबाबदारी असली तरी काही बाबतीत मंत्र्यांची वैयक्तिक जबाबदारी पण असते. संसदेच्या सभागृहामध्ये त्यांच्या खात्याविषयी विचारण्यात आलेल्या प्रश्नांना संबंधीत मंत्र्यांनी उत्तरे दिली पाहिजेत. मंत्रिमंडळाचा निर्णय असला तरी जर मंत्र्याला असे वाटले की, आपल्या कृत्यामुळे मंत्रीमंडळावर टीका होत आहे तरी त्या मंत्र्याने आपली जबाबदारी समजून राजीनामा देणे योग्य ठरते. मंत्री स्वत:च्या चूकीबद्दल जबाबदार असतो व त्यासाठी त्याने राजीनामा देणे गरजेचे असते. राष्ट्रपती फक्त एखाद्याच मंत्र्याला पदच्युत करू शकतात असे नाही. तर जर लोकसभेने मंत्रीमंडळाविरूद्ध अविश्वासाचा ठराव संमत केला व त्यानंतर ही जर पंतप्रधानांनी राजीनामा नाही दिला तर राष्ट्रपती सामूहिक जबाबदारीच्या तत्त्वानुसार सर्वच मंत्रीमंडळाला पदच्युत करू शकतात. यावरून भारतातील संयुक्त जबाबदारीच्या तत्त्वाचे महत्त्व स्पष्ट होते.

भारतामध्ये संयुक्त जबाबदारीचे तत्त्व किती महत्त्वाचे आहे हे खालील काही उदाहरणावरून स्पष्ट होते.

१) पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांच्या मंत्रीमंडळाविरूद्ध ७ नोव्हेंबर १९९० रोजी लोकसभेने ३४६ विरूद्ध १४२ मतांनी अविश्वास ठराव मंजूर केला. त्यामुळे व्ही. पी. सिंग चे सरकार सत्तेवरून पायउतार झाले होते.

२) पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना लोकसभेचा पाठींबा प्राप्त न झाल्यामुळे त्यांचे मंत्रीमंडळ केवळ तेरा दिवसातच पायउतार झाले होते.

३) पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी तेरा महिने सत्तेवर राहिल्यानंतर लोकसभेतील त्यांनी बहुमत गमावले आहे असे प्रथम दर्शनी स्पष्ट झाल्यानंतर राष्ट्रपतीने त्यांना विश्वासदर्शक ठराव संमत करून घेण्याचा आदेश दिला होता. या ठरावावर १७ एप्रिल १९९९ रोजी अनुकूल २६९ व प्रतिकूल २७० असे मतदान होऊन विश्वासदर्शक ठराव संमत होऊ न शकल्याचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींचे मंत्रीमंडळ पुन्हा कोसळले होते.

गोपनीयतेच्या संदर्भामध्ये सांगावयाचे झाल्यास पंतप्रधानाशी मंत्र्याचा मतभेद झाल्यामुळे काही मंत्र्यांना मंत्रीमंडळातून काढून टाकावे लागले

तर काही मंत्र्यांना राजीनामे देऊन मंत्रीमंडळाबाहेर पडावे लागले. त्याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत.

१) १९५१ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पंतप्रधानांशी मतभेद झाल्याने तसेच इ. स. १९५६ साली सी. डी. देशमुख व सन १९६५ मध्ये तत्कालीन अर्थमंत्री टी. टी. कृष्णाम्माचारी यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. अशाच प्रकारे के. सी. नियोगी, अजितप्रसाद जैन, माधवसिंग सोळंकी इत्यादी मंत्र्यांना मंत्रीमंडळातून आपला राजीनामा दिला होता.

२) के. डी. मालवीय, व्ही. पी. कृष्ण मेनन, मोहन धारिया इत्यादी मंत्र्यांना त्या त्या वेळेच्या पंतप्रधानांनी राजीनामे घेतले होते.

**सारांश:**

लोकशाही ही एक विशिष्ट प्रकारची राज्यपद्धती असून ही लोकशाही सामाजिक ध्येयाच्या पुरस्कारात मानव संस्कृती संबंधी विशिष्ट प्रकारची भावना आणि कल्पना अंतर्भूत झालेल्या असतात. म्हणून एक मानव संस्कृतीचा आदर्श म्हणून लोकशाहीला गणले जाते. विशिष्ट नैतिक तत्त्वे आणि सामाजिक मूल्ये या लोकशाहीमध्ये अंतर्भूत झालेली आहेत. मनुष्य स्वभावाच्या वास्तविक आणि आदर्शभूत स्वरूपासंबंधी ही काही सिद्धांत लोकशाहीच्या ध्येयाशी निगडीत झालेले आहेत.

लोकशाही राज्यातील सर्व प्रौढ स्त्री-पुरूष नागरिकांना मतदानाचा अधिकार असावा. या मतदाराकडून निवडण्यात आलेल्या प्रतिनिधी सभेला राज्यकारभारावर देखरेख ठेवणे, कायदे तयार करणे, कर बसविणे, विधेयके मंजूर करणे इत्यादी हक्क असावेत. राज्यातील कारभाराबद्दल एक सामूहिक जबाबदार असणारे मंत्रिमंडळ या प्रतिनिधी सभेला जबाबदार असावे किंवा मतदारांनी स्वतंत्रपणे निवडलेल्या राष्ट्राध्यक्षास जबाबदार असावे म्हणजेच राज्यकारभारावर ही अंतिम सत्ता लोकांनी निवडलेल्या प्रतिनिधींची अथवा लोकनियुक्त राष्ट्राध्यक्षाची असावी. राज्यातील सर्व राज्यकारभार, लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी केलेल्या कायद्यानुसार, त्यांच्या संमतीने आणि त्यांच्या नियंत्रणाखाली चालावा. या कायद्याविरूद्ध कोणीही गैरवर्तन केले तर त्यास स्वतंत्र न्यायालयापुढे उघड चौकशी करून त्यास शासन व्हावे. कोणाच्याही जीवितास, वित्तास, प्रतिष्ठेत कायद्यांनी घालण्यात आलेल्या मर्यादा व्यतिरिक्त धक्का बसू नये. न्यायालयातील अधिकाऱ्यावर राज्यकारभार करणाऱ्या राज्यकर्त्यांची हुकुमत चालू नये. म्हणजे न्यायदान करताना राज्यकर्त्याला त्यामध्ये ढवळाढवळ करता येवू नये. अंतिम राजकीय सत्ता लोकांकडेच असावी आणि लोकांना आपल्या मतानुसार राज्यकारभार नियमित व नियंत्रित करता यावा. राज्यकर्ते हे प्रजेचे स्वामी नसून ते तिचे सेवक, कायदेशीर सेवक बनावेत आणि प्रजा हीच सर्वोच असावी

अशाप्रकारे आपल्याला लोकशाही शासन पद्धतीचे सामान्य स्थूल वर्णन करता येईल.

**संदर्भ सूची:**


१) घांगरेकर चिं. ग., 'राज्यशास्त्राची मुलतत्त्वे', मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ. २२७.

२) प्रा. इंदा पवार दि. वा., 'राजकीय सिद्धांतवाद', श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ. ११८.

३) प्रा. बोरकर कृ. दि., प्रा. घोरपडे किरण, 'इंग्लडची शासन पद्धती', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, पृ. ३२, ३३.

४) गोरे स. ना., कुलकर्णी अ. र., 'भारतीय राज्यघटनेचा इतिहास', महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे, पृ. ६०.

५) डॉ. भोसले शांताराम, 'भारतीय राष्ट्रीय आंदोलने आणि घटनात्मक विकास', विद्या प्रकाशन, नागपूर, १९९०, पृ. ४९.

६) प्रा. देशपांडे श्री. वि., 'भारताचे संविधान स्वरूप आणि राजकारण', श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ. ११९.